# श्री. गणेशराव महादेवराव नळवाले

सेवक क्र. ४०१

मु. जुनी मंगळवारी, नागपूर

महानत्यागी बाबा जुमदेवजी यांच्याशी माझे संबंध असल्यामुळे त्यांच्याकडे नेहमी जाणे-येणे होते. आमचे मामाजी श्रीमान मारोतराव ठुब्रीकर व श्री. बाजीरावजी माटे यांनी मला ह्या मार्गावर येण्याबद्दल दोन-तीन वेळा सांगितले पण मी हो म्हणून काही महिने लक्ष दिले नाही. नंतर माझी बदली नागपूरवरुन अमरावतीला झाली. मी एकटाच अमरावतीला गेलो. सर्व कुटुंब नागपूरलाच ठेवले होते. मी सतत दोन वर्ष नागपूरला बदली व्हावी म्हणून प्रयत्न केलेत. परंतु बदली झाली नाही. नंतर माझ्या मनाला वाटले की आपण दरारोज बाबा हनुमानजी यांच्या नावाने अगरबत्ती लावून नागपूरला बदली करुन देण्याबद्दल विनंती करावी. त्याप्रमाणे विनंती करण्यास सुरुवात केली आणि लगेच माझी बदली नागपूरला झाली. नागपूरला बदली झाल्यानंतर मला ह्या मार्गाचा स्वीकार करावा असे वाटू लागले. आमच्याकडे पुष्कळसे देव होते. काही देवांचे नाव सुध्दा माहीत नव्हते. दरवर्षी दोन तीन वेळी तरी कोंबळे कापावे लागत असे. म्हणून मला वाटले की जर आपण हा मार्ग घेतला पर आपल्याला काहीच करावे लागणार नाही. तसेच ह्या मार्गाची शिकवण मला फारच आवडली. नंतर मी महानत्यागी बाबा जुमदेवजी यांच्याकडे जाऊन बेचाळीस दिवसांची साधना घेतली. या बेचाळीस दिवसांत आम्हाला सुख समाधान लाभले.

या मार्गात असताना एक दिवस माझी मुलगी कु. वंदना ही फारच आजारी झाली. तिला डॉक्टरचे औषध जालू होते. तरीपण तिची प्रकृती जास्तच बिघडत होती. तिचे खाणे-पिणे बंद झाले. ती दूधसुध्दा घेत नव्हती. तिला उठणे-बसणेही अशक्य झाले. ती अंथरुणावर झोपून राहत असे ती एवढी बारीक होऊन गेली होती की तिचे हाड अन हाड दिसायला लागले होते. हातपाय हालविण्याची शक्ती तिच्यात राहिली नव्हती आणि ती झोपल्या झोपल्या एकसारखी टक लावून पाहत होती. अशा परिस्थितीत माझे नातेवाईक मला म्हणायचे की, आता ही वाचू शकत नाही. तेव्हा मी त्यांना मोठ्या हिंमतीने व विश्वासाने सांगत होतो की ती मरत नाही. आमचे काहीतरी चुकले आहे आणि ते आम्हाला आठवत नाही. म्हणून हा त्रास मुलीला होत आहे. नंतर मी महानत्यागी बाबा जुमदेवजींकडे गेलो आणि बाबांना हकीगत सांगितली. बाबांनी मला तीन दिवस भगवान बाबा हनुमानजींच्या फोटोची दही-दुधाने आंघोळ करण्यास

व सर्वांनी मिळून क्षमा मागण्यास सांगितले. त्यानंतर दुसऱ्या दिवसापासून कार्यास सुरुवात केली. औषध बंद केले आणि बिना औषधाने मुलीची प्रकृती सुधारु लागली. तीन दिवसांत प्रकृतीला आराम झाला.

एकदा माझी प्रकृती बिघडली. माझे दोन्ही गाल एकदम खूप सुजून गेले. खूप त्रास होत होता. मी डॉक्टरांचे औषधोपचार केले तरीपण त्रास काही कमी होत नव्हता. तो वाढतच होता. अशा वेळेस बाबांना विनंती केली व बाबांना म्हटले, 'बाबा माझ्याकडून काय चुक झाली आहे माझ्या लक्षात येत नाही. पण नक्कीच माझ्याकडून काहीतरी चूक झाली आहे म्हणून मला त्रास होत आहे. तरी आपण मला दयाळू अंतःकरणाने क्षमा करावी. त्याच दिवशी रात्री मला स्वप्न पडले ते असे की एक राक्षस माझ्या अंगणात उभा आहे आणि तो म्हणतो की, मी तुमच्या घरी आत शिरतो, त्याच वेळेस महानत्यागी बाबा जुमदेवजी प्रगट झाले व ते राक्षसास म्हणाले,'यहा बाबा हनुमानजी का पहारा है, आप अंदर नही आ सकते' असे बाबांनी म्हटल्यानंतरही तो राक्षस आत शिरण्याकरिता समोर आला. तेव्हा महानत्यागी बाबा जुमदेवजी यांनी त्याला तीन गुद्दे मारले. तेव्हा तो राक्षस पळाला व बिना औषधाने माझी प्रकृती चांगली झाली. महानत्यागी बाबा जुमदेवजी हे स्वयम आपल्या सेवकांकरिता भगवानच आहेत कारण त्यांच्या मार्गदर्शनावर आपल्याला हे अनुभव घडलेले आहेत.

मला घर बांधायचे होते. ज्या जागेवर बांधकाम करायचे होते तिथे एक किरायेदार होता. त्याला घर रिकामे करण्याची नोटीस दिली. बांधकामाचा नकाशा दाखविला. बांधकाम करण्याकरिता कर्ज घेतले आहे व ते मिळाले आहे हे सुध्दा त्याला सांगितले. पुष्कळ प्रकारे समजाविले तरी तो घर रिकामे करीत नव्हता. अरेरावीच्या गोष्टी करीत असे. पोलीसमध्ये गेला. खोटे रिपोर्ट दिले. बांधकामाकरिता आलेल्या विटा तो वर फेकून फोडीत होता. हे सर्व मी सहन करीत होतो. खूप विचार माझ्या समोर होता. सर्व प्रयत्न करुन पाहिल्यानंतर मी बाबांना सात दिवस विनंती करण्याचे ठरविले. त्या कालावधीत किरायेदार फार आजारी पडला. तो चालू शकत नव्हता. किडनीचा आजार झाला. रक्ताचे पाणी झाले. त्याच कालावधीत असे घडले की, मला रात्री एक स्वप्न पडले. मी नदीच्या एका किनाऱ्यावरुन दुसऱ्या किनाऱ्यावर नदीतून जात आहे. नदीमध्ये पूर्ण वाळू होती. मी मध्यभागी गेल्यावर एकाएकी अचानक फार मोठा पूर आला. त्या पुरासोबत एक वाळूचा मोठा ढीग वाहून आला. त्या ढिगाला मी दोन्ही हातांनी कवटाळून खाली डोळे लावून झोपून गेलो व बाबा हनुमानजी म्हणत राहिलो. पूर्ण पूर निघून गेल्यावर मी डोळे उघडून पाहिले तर मला पहिल्यासारखी नदीत पूर्ण वाळू दिसू लागली. त्यानंतर लगेच किरायेदाराने बांधकामाकरिता जागा खाली करून दिली. याप्रमाणे भगवंताने माझ्यावरील संकट नेहमीकरिताच दूर केले. मला भगवंताने जो योग दिलेला आहे त्याबद्दल मी त्याचा सदैव आभारी आहे. तसेच मी जीवनभर बाबांनी दिलेल्या तत्त्व, शब्द व नियमांचे तसेच बाबांच्या आदेशाचे पालन करीन.

* * * * *